२५

संदर्भ १ नाम.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. General (Admn)/Judl./2007. dt. 12.06.2007 व त्यासोबचे दिनांक ११/०६/२००७ चे परिपत्रक.

२ दिवाणी नियमावली १९८६ मधील प्रकरण ३६, परिच्छेद ७०१

३ कॉम्पेण्डियम मधील अनुक्रमांक ३१

४ निवडणूक निर्णय अधिकारी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघ, रत्नागिरी यांचेकडील निवडणूकीची सूचना दिनांक १२/०४/२०२४.

५ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक ०३/०४/२०२४.

.............

# कार्यालयीन आदेश

लोकसभा सार्वत्रीक निवडणूक-२०२४ च्या कार्यक्रमानुसार निवडणूक निर्णय अधिकारी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघ, रत्नागिरी यांचेकडील संदर्भ क्र.४ ची निवडणूकीच्या सूचनेनुसार ४६- रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाची निवडणूक मंगळवार दिनांक ०७/०५/२०२४ रोजी होणार आहे. तर रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणूक मंगळवार दिनांक ०७/०५/२०२४ रोजी होणार आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी हे दिवाणी नियमावली पुस्तिकेच्या प्रकरण ३६ मधील परिच्छेद क्र.७०१ नुसार, प्रशासकीय व वित्तीय अधिकारपुस्तिकेच्या कॉम्पेण्डियम अनुक्रमांक ३१ मध्ये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

४६-रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघात मोडणाऱ्या रत्नागिरी मुख्यालयातील सर्व तसेच देवरुख, लांजा, राजापूर, चिपळूण तालुकास्तरावरील तसेच ३२-रायगड लोकसभा मतदारसंघामधील २६३-दापोली विधान सभा मतदार संघ व २६४-गुहागर विधानसभा मतदार संघ यामध्ये समाविष्ट असलेल्या खेड,गुहागर, दापोली व मंडणगड तालुका स्तरावरील सर्व अपिलीय, दिवाणी व फौजदारी न्यायालयांस मदतानाकरीता मंगळवार दिनांक ०७/०५/२०२४ रोजी स्थानिक सुट्टी जाहिर करणेत येत असून दिनांक ०७/०५/२०२४ रोजी ४६- रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा निवडणूक क्षेत्रातील व ३२-रायगड लोकसभा मतदारसंघामधील २६३-दापोली विधानसभा मतदार संघ व २६४-गुहागर विधानसभा मतदार संघामध्ये निवडणूक क्षेत्रापुरती समाविष्ट असलेल्या खेड, गुहागर, दापोली व मंडणगड तालुक्यातील सर्व न्यायालयांचे अपिलीय, दिवाणी व फौजदारी न्यायालयीन व कार्यालयीन कामकाज बंद राहील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच मा.उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे परिपत्रक क्र.साधारण/प्रशासन/न्यायिक/२००७, दिनांक ११/०६/२००७ मधील निर्देशानुसार उपरोक्त जाहिर स्थानिक सुट्टी ऐवजी दिनांक २२/०६/२०२४ (चौथा शनिवार) या सुट्टीचे दिवशी रत्नागिरी मुख्यालय तसेच रत्नागिरी जिल्हयातील सर्व तालुकास्तरावरील सर्व अपिलीय, दिवाणी व फौजदारी न्यायालयीन व कार्यालयीन कामकाज सुरु राहिल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिका-यांना अशी विनंती करणेत येते की, यापूर्वी दिनांक ०७/०५/२०२४ रोजी न्यायालयीन प्रकरणे बोर्डावर ठेवणेत आली असतील तर ती दुसरे दिवशी म्हणजे दिनांक ०८/०५/२०२४ रोजीचे बोर्डावर घेणेत यावीत व तशी सुचना न्यायालयाचे नोटीस बोर्डावर त्वरीत प्रसिध्द करणेत यावी.

संबंधीत न्यायालयाने सदर आदेशाची एक प्रत त्यांचे न्यायालयाचे नोटीस बोर्डावर, एक प्रत अध्यक्ष बार असोसिएशन, सरकारी वकील, पोलीस स्टेशन यांना आदा करुन तसे केल्याचे इकडे कळविणेत यावे.

सदर आदेशाची समज संबंधितांना देणेत यावी.

23/4/24

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक - २९/०४/२०२४

(एस.एस.गोसावी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी

****************

म.जा.क्र.प्रशा.ब-४/२५४४ सन २०२४
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक - २९/०४/२०२४

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

१. मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
२. मा.प्रबंधक (निरीक्षणे-१), उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक - २९/०४/२०२४

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी

प्रत माहितीस्तव सादर अग्रेषित

१. रत्नागिरी मुख्यालयातील तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी यांना

रत्नागिरी जिल्हयातील सर्व प्रमुख न्यायिक अधिकारी यांनी सदर कार्यालयीन आदेशाची एक प्रत त्यांचे न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी. तसेच सदर कार्यालयीन आदेश त्यांचे न्यायालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणावा.

२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा, सातारा, अहमदनगर, सोलापूर, सांगली, पूणे, कोल्हापूर, परभणी, लातूर, उस्मानाबाद, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, अकोला, अमरावती, बीड, बुलढाणा, नांदेड, धुळे, नागपूर, जळगांव, ठाणे, औरंगाबाद, नाशिक, रायगड–अलिबाग, जालना, सिंधुदुर्ग–ओरोस, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, गोंदिया.
३. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रत्नागिरी
४. जिल्हा सरकारी वकील, रत्नागिरी
५. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
६. पोलीस अधिक्षक, रत्नागिरी
७. अध्यक्ष बार असोसिएशन, रत्नागिरी/खेड

प्रत माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी अधिक्षक(आस्था/न्याय), सहा.अधिक्षक (वित्त/अभिलेख/न्याय/आस्था–२), संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे रवाना

सहा.अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांनी सदर कार्यालयीन आदेशाची एक प्रत जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी. तसेच सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालयातील सर्व कर्मचा–यांचे निदर्शनास आणावा.

आदेशावरुन

प्र/प्रबंधक
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी